सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# जिल्हाधिकारी कार्यालय,पुणे ,(आपत्ती व्यवस्थापन शाखा)

दुरध्वनी क्र.020-26123371
E-Mail- homebranchpune@gmail.com

वाचा :-१) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005
२) महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951
३) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम 1897
४) मा.प्रधान सचिव , सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय मुंबई यांचेकडील पत्र दि.14/03/2020 व पत्र क्र.करोना-2020/प्र.क्र.58/आरोग्य 5, दि.16/3/2020

**********************************************************************************

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,
जिल्हाधिकारी कार्यालय पुणे,
क्र.जि.आ.व्य/कोरोना विषाणू/१२४/2020.
पुणे, दिनांक :- १६/03/2020.

विषय :- कोरोना या विषाणूचा संसर्ग व प्रादूर्भाव रोखणे करीता
**पुणे जिल्हयातील आस्थापन बंद करणेबाबत**

## आदेश

ज्याअर्थी, आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 मधील कलम 25 अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे व त्यातील पोट कलम 2 (अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिद्ध अध्यक्ष आहेत.

आणि ज्याअर्थी , आंतरराष्ट्रीय स्तरावर व देशांतर्गत कोरोना या विषाणूचे संसर्ग बाधीत रुग्ण आढळत आहेत तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरुन व देशांतर्गत विमान प्रवासाव्दारे प्रवासी भारतात सर्वत्र प्रवास करीत आहेत .असे प्रवासी पुणे जिल्हयामध्येही परदेश प्रवास करुन आलेले आहेत व बरेच प्रवासी परतण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे कोरोना या विषाणूचा संसर्ग व प्रादूर्भाव पसरण्याची शक्यता लक्षात घेता त्यावर तत्काळ नियंत्रण करणे व कोरोना विषाणूचे संसर्ग असल्यास त्यात अधिक वाढ होऊ न देता त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना आखणे आवश्यक आहे. अशा प्रवाशांमुळे कोरोना विषाणूचा संसर्ग जिल्हयात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यास्तव गर्दीच्या ठिकाणी जाणे, वास्तव्य करणे, इत्यादी बाबी टाळणे अत्यावश्यक आहे.

उपरोक्त प्रमाणे कोरोना विषाणूच्या प्रसाराचे माध्यम पहाता, सदर विषाणूची लागण एका संक्रमीत रुग्णाकडून अन्य व्यक्तीस/इसमास त्याच्या संपर्कात आलेने होण्याची शक्यता विचारात घेता, **मी नवल किशोर राम ,अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण तथा जिल्हादंडाधिकारी पुणे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ तसेच महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ चे अधिकाराचा वापर करुन या आदेशाव्दारे मोठया प्रमाणात**

लोकांचा समुह एकत्रित जमु न देण्यासाठी संपुर्ण पुणे जिल्हयामधील १.चित्रपत्रगृह २. तरणतलाव ३. व्यायामशाळा ४. नाटयगृहे ५. म्युझियम तसेच प्रेक्षागार व कलाकेंद्र इत्यादीवर दि.१६ मार्च २०२० ते दि. ३१ मार्च २०२० पर्यत बंदी लागू करीत आहे.

या दिलेल्या आदेशाचे उल्लंघन केल्यास भारतीय दंड संहिता कलम १८८ व आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ याव्दारे आवश्यक ती कारवाई करण्यात येईल.

(नवल किशोर राम)
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे**

**प्रति,**

1. **मा. विभागीय आयुक्त पुणे विभाग पुणे यांजकडे माहितीसाठी सविनय सादर**
2. **आयुक्त पुणे महानगरपालिका व पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
3. **पोलीस आयुक्त, पुणे शहर व पिंपरी चिंचवड .**
4. **पोलीस अधिक्षक पुणे ग्रामीण**
5. **मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पुणे,**
6. **तहसिलदार, करमणुकर शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय पुणे**